
# प्रेषितांनी वडीलांना करायाला सागितले तेच देवाचे मेंढपाळ करतात

मुलांना शिकवणायांनी P1b हा अभ्यास वाचावा.




''तुम्हांतील वडिलांना, जो मी सोबतीचा वडील, ख्रिस्ताच्या दु:खांचा साक्षी व प्रगट होणाया गौरवाचा वाटेकरी तो मी असा बोध करितो, तुम्हांमधील देवाच्या कळपाचे पालन करा, करावे लागते म्हणून नव्हे, तर देवाच्या इच्छेप्रमाणे संतोषाने त्याची देखरेख करा. द्रव्यलोभाने नव्हे तर उत्सुकतेने करा. तुमच्या हाती सोपविलेल्या लोकांवर धनीपण करणारे असे नव्हे, तर कळपाला कित्ते व्हा, मग जेव्हा मुख्य मेंढपाळ प्रगट होईल तेव्हा तुम्हांस गौरवाचा न कोमेजणारा हार प्राप्त होईल'' (1 पेत्र 5:1-4).

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, तू देखभालीसाठी आमच्याकडे सोपवून दिलेल्या मंडळीची काळजी घेण्यास कृपा करुन आम्हा वडिलांचे साहाय्य कर. हे काम आम्ही पैशासाठी नाही तर मनापासून करावे याकरीता आमचे साहाय्य कर. आम्ही त्यांच्यावर हुकूमत न गाजवता, येशू व त्याच्या शिष्यांनी घालून दिलेल्या आदर्शाप्रमाणे नम्रपणे सेवा करण्यासाठी मदत कर.''

**1. मेंढपाळाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी देवाच्या वचनातून तयारी करा.**

**पाहा प्रे.कृ. 20:17-38 मध्ये** पौलाने त्याचे बोलणे व उदाहरण यातून वडीलांनाकाय करण्याची सूचना दिली.



- वडीलांनी शिक्षण दिले ती जागा *(वचन 20)*
- वडीलांनी काय सांगितले पाहिजे. *(वचन 27)*
- वडीलांनी सावध का राहावे. *(वचने 28-29)*
- लांडगे कोठे येतात. *(वचने 30-31)*
- पौलाने इफिसमध्ये आपली उपजिवीका कशी चालवली. *(वचने 33-35)*
- वडीलांनी त्यांच्या मार्गदर्शका विषयीची प्रीती कशी दाखवली. (वचने 36-38)

**पाहा तीत 1:5-9** मध्ये वडीलांची नेमणूक करण्याची कारणे आणि त्यांची पात्रता :

- क्रेत मधील प्रत्येक शहरात तीताने काय करायचे होते. *(वचने 4-5)*
- वडीलांची पात्रता *(वचने 6-9)*

या ठिकाणी काही क्षण थांबा आणि पाळक-मेंढपाळांच्या अंगी कोणते स्वाभाविक सद्‌गुण असले पाहिजेत याची पौलाने यादी दिली आहे, त्याची प्रार्थनापूर्वक उजळणी, तसेच तुमच्या अंगी असलेच पाहिजेत अशा दोन वा तीन सद्‌गुणांची निवड करा.




**''अध्यक्ष हा...अदूष्य असला पाहिजे...संयमी असावा...'' तीत 1:7-8**

**पाहा इफिस 4:11-12 मध्ये** पुढ़ायांसाठीच्या आवश्यक गोष्टी. (उत्तरे पुढे दिलेल्या वचनांतून पाहा).

- तुमच्या शिक्षणातून विश्वासणायांना काय करता आले पाहिजे *(वचने 11-12).*
- तुमच्या पुढारीपणा मागील देवाचा हेतू. *(वचन 13)*
- सिद्धांत तत्त्वांच्या संबंधात तुमच्या पुढारीपणाचे परिणाम. *(वचन 14)*
- विश्वासणायांनी कसे बोलावे व त्यातून होणारे परिणाम. *(वचन 15)*
- विश्वासणायांनी एकमेकांशी कसे वागावे व त्याचे परिणाम. *(वचन 16)*

**पाहा मत्तय 18:15-17 मध्ये** वाईट अयोग्य वर्तणूकीचे वृत्त वडीलांनी कशा प्रकारे हाताळावे. तक्रारीची तुम्ही दखल घेण्यापूर्वी त्याबाबतीत काय करावे?




2. **आठवडयातील कार्यक्रमांची रूपरेखा सहकायांशी चर्चा करुन ठरवा.**

पाळक मेंढपाळ या नात्याने तुम्हांला तुमची कर्तव्ये पार पाडता यावीत यासाठी देवाकडे साहाय्य मागा.

तुमच्या मंडळीतील कोणत्या सेवाकार्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे ते लक्षात घेऊन त्यांचा विकास करण्यासाठी योजना आखा.

**समुपदेशन,** थेट हल्ला न करता संकटातील किंवा वाहवत गेलेल्या मेंढराला पुन्हा पूर्वपदी आणा, 1 करिंथ 5, गलती 6:1-2

**वैवाहिक व कौटुंबिक जीवन बळकट करा,** इफिस 5:21 ते 6:4 विश्वासणायांना

**प्रार्थना करण्यास** आणि दररोज वैयाक्तिक व कौटुंबिक भक्ती करण्यासाठी साहाय्य करा, 1 थेस्सल 5:17.

**आजारी, गरजू** आणि **अन्यायाला बळी पडलेल्यांसाठी** प्रार्थना करा, उत्पत्ती 18:20-33, याकोब 5:14-15.

शरीररूप मंडळीतील आणि व्यापक अर्थाने समाजातील **गरजूंची सेवा करा.** प्रे.कृ. 6:1-6, गलती 6:10.

देवाने आम्हांला दिले ते कारभारी म्हणून **द्या,** लूक 6:38, मत्तय 25:14-30.

सर्वांना आपआपल्या आध्यात्मिक कृपादानांनी एकदिलाने शरीररूपी मंडळीत सेवा करता यावी यासाठी **संयोजन करा,** 1 करिंथ 12

मंडळीतील आणि इतर मंडळयांमध्ये **एकमेकांची सेवा करा,** 1 करिंथ 12, इफिस 4:11-16, रोम 12:4-16.

मंडळीतील सदस्यांमध्ये प्रेमळ **सहभागिता** वाढवा, रोम 12:3-21, 1 करिंथ 13.

प्रभुभोजनाच्या विधीसह एक शरीर म्हणून **उपासना करा,** मत्तय 26:26-28, इब्री. 10:25, प्रे.कृ. 2:46, 20:7

**लोकांना येशूविषयी सांगा,** लूक 24:46-48, प्रे.कृ. 1:8, 2 तीमथ्य 4:5.

येशूच्या आज्ञेप्रमाणे वागणायांना **शिष्य करा** मत्तय 28:18-20 (उदाहरण : प्रे.कृ. 2:37-47)

विश्वासणायांना सेवाकार्यासाठी सुसज्ज करण्याकरीता **वचनाचा उपयोग करा.** 1 तीमथ्य 3:16-17, याकोब 1:22-26, इफिस 4:11,12

दुर्लक्ष होत असलेल्या लोकांसाठी **नवीन मंडळया सुरु करा,** प्र.कृ. अध्याय 13 व 14.

'प्रेषितांना' **तयार करुन** सुवार्ता ऐकून स्वीकारणाया, दुर्लक्षित लोकांकडे **पाठवा,** मत्तय 28:18-20, प्रे.कृ. 1:8, 13:1-3

**नवशिके पाळक मेंढपाळ** आणि उमेदवार प्रेषितांना **मार्गदर्शन करा,** मार्क 3:14, तीत 1:5, 2 तीमथ्य 2:2.

**3. येणाया उपासनासभेविषयीचे कार्यक्रम सहकायांशी चर्चा करुन ठरवा.**

**प्रे.कृ. 20:17-38** मधून पौलाने इफिसकर वडीलांची सभा घेतली त्याविषयी सांगा. तुम्हांला समजलेल्या गोष्टींवर प्रश्न विचारा (भाग1).

देखरेख करणाया वडीलांची पात्रता व कर्तव्ये **स्पष्ट करा.**

सुधारणा होण्याची आवश्यकता असणाया सेवाकार्यांकरीता तुम्ही आखलेल्या योजना **जाहिर** करुन त्यावर चर्चा करा (भाग 2)

**प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यसाठी** योहान 10:11-15 व 27-30 ही वचने वाचा. येशू हा उत्तम मेंढपाळ आहे आणि त्याने आपल्या मेंढरांसाठी म्हणजे तुमच्या-माझ्यासाठी आपले रक्त सांडले, हे स्पष्ट करुन सांगा.

मुलांनी तयारी केलेले कार्यक्रम त्यांना सादर करण्यास सांगा (मुलांना शिकवणाया शिक्षकांनी नेहमी पौल-तिमथी मेंढपाळांचा अभ्यास आणि मुलांसाठीचा अभ्यास दोन्हींचा क्रमांक आणि विषय एकच असलेला वापरावा).

दोन वा तीन जणांचा गट करुन एकमेकांसाठी प्रार्थना करुन प्रोत्साहन द्या आणि योजना आखा.

**पाठ करा यिर्मया 3:15**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net